पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक नियंत्रण अधिसुचना/७७९ /२०२४ दि. १४/०६/२०२४

**–: <u>वाहतूक नियंत्रण अधिसुचना</u> :–**

**ज्याअर्थी**, ठाणे महानगरपालिका **क्षेत्रामध्ये वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. २३/०६/२०२४ रोजी **लीव फिट वेलनेस सर्व्हिसेस** कंपनी कडून **'मॅरेथॉन स्पर्धा'चे** आयोजन करण्यात आलेले आहे. कोणत्याही स्पर्धकाला इजा होऊ नये व कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरीता कोरम मॉल कडून वर्तकनगर – उपवन तलाव – पलायादेवी मंदिर – बिरसा मुंडा चौक कडे जाणारी सर्व वाहतूक पूर्णपणे बंद करून पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए. – ११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ )(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) माजिवडा व खोपट कडून कॅडबरी ब्रिज खालून वर्तकनगर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कॅडबरी जंक्शन येथील वर्तकनगर कडे जाणाऱ्या वाहिनीवरील सिग्नल जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने वर्तकनगर कडून कॅडबरी जंक्शन कडे येणाऱ्या वाहिनीवरील तीन लेन पैकी एक लेन वरून वर्तकनगर रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कोरस टॉवर – लोकमान्यनगर पाडा नं. १ परिसरातून जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **वर्तकनगर नाका सायकल स्टॅण्ड येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने लक्ष्मी पार्क सोसायटी कडून पुढे जाऊन शास्त्रीनगर नाका चौक येथून डावे वळण घेवून आसावरी बिल्डींग येथून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) समतानगर परिसरातून जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **श्री जैन ट्रेडर्स दुकान, रेमण्ड गेट समोरील समतानगर कट येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने समतानगर – देव अशोका बिल्डींग समोरून डावे वळण घेवून रामचंद्र नगर – नितिन जंक्शन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २३/०६/२०२४ रोजी सकाळी ०५:०० ते १०:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

<u>प्रति,</u>

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

<u>प्रत</u> :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.